ePaper

## बाळासाहेबांच्या जयंतीच्या दिवशीच राज्यात मोठा राजकीय भूकंप?



‖ वर्ष - 8 । अंक -191 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 21 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- रोहितच्या डान्सचा व्हीडिओ व्हायरल
- मुंबईच्या रणजी संघाची घोषणा!
- अमेरिकेसारखा देश या जगात नाही!
- कोलकाता बलात्कार: रॉयला जन्मठेप!


## नाशिकवर दादा भुसे, कोकाटेंची दावेदारी

# पालकमंत्रिपदासाठी रस्सीखेच!

### महाजन कुंभमेळामंत्री? गिरीश महाजन यांच्या नियुक्तीला स्थगिती

। नाशिक । महाईन्यूज

**आगामी सिंहस्थातील कोटीच्या कोटी उड्डाणांवर नजर ठेवून असलेल्या महायुतीच्या मंत्र्यांमध्ये नाशिकच्या पालकमंत्रिपदावरून जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे. नाशिकच्या पालकमंत्रिपदावरील गिरीश महाजन यांच्या नियुक्तीला स्थगिती मिळाल्यानंतर या पदावर आता शिवसेना शिंदे गटाकडून दादा भुसे, तर राष्ट्रवादीकडून ॲड. माणिकराव कोकाटेंनी दावा ठोकला आहे.**



राष्ट्रवादीला रायगड हवे असेल, तर नाशिक आम्हाला द्या, अशी खेळी शिंदे गटाकडून खेळली जात आहे. दुसरीकडे रायगड शिवसेनेला देऊन राष्ट्रवादी नाशिक पदरात पाडून घेणार असल्याची चर्चा सुरू आहे. नाशिकमध्ये भुसेंना पालकमंत्रिपद देऊन गिरीश महाजन यांना कुंभमेळामंत्री आणि सहपालकमंत्री करण्यावरही सध्या महायुतीत खल सुरू आहे. राज्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या शपथविधीनंतर तब्बल तीन आठवड्यांनी मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. त्यानंतर पालकमंत्रिपदे वाटपावरूनही महायुतीत मोठी रस्सीखेच पाहायला मिळाली. त्यामुळे तब्बल तीन आठवडे पालकमंत्रिपदांची घोषणाच झाली नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाओस दौऱ्यावर जाण्यापूर्वी पालकमंत्रिपदांची यादी जाहीर केली असली, तरी या यादीवरून आता महायुतीत नाराजीनाट्य सुरू झाले आहे. महायुतीतील राज्यमंत्र्यांना पालकमंत्रिपद मिळाले असताना शिवसेना शिंदे गटातील ज्येष्ठ मंत्री तथा शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे आणि आणि मंत्री भरत गोगावले यांना कोणत्याच जिल्ह्याचे पालकत्व देण्यात आले नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. भुसे यांना नाशिकचे, तर गोगावले यांनी रायगडचे पालकमंत्रिपद हवे होते.

परंतु, फडणवीस यांनी रायगड येथे राष्ट्रवादीच्या अदिती तटकरेंची, तर नाशिक येथे गिरीश महाजन यांनी नियुक्ती केली. त्यामुळे शिंदे गटात नाराजीनाट्य सुरू होऊन वरिष्ठांनी आक्रमक पवित्रा घेतला. नाराज झालेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट दरे गाव गाठले. त्यामुळे फडणवीस यांनी तातडीने नाशिक आणि रायगडच्या नियुक्तीला स्थगिती दिल्याने आता उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

#### सहपालकमंत्रिपदावर खल

नाशिकमधून राज्य मंत्रिमंडळात तीन कॅबिनेट मंत्री असतानाही यापैकी एकालाही पालकमंत्रिपद न दिल्याने शिंदे गट आणि राष्ट्रवादीत नाराजी होती. त्यात गेल्यावेळेस नाशिकचे पालकमंत्री राहिलेले दादा भुसे हे शिवसेना शिंदे गटाचे ज्येष्ठ मंत्री असतानाही त्यांना नवीन सरकारमध्ये पालकमंत्रिपदापासून दूर ठेवण्यात आले. आपल्याला नाशिक मिळाले, तरच आपण पालकमंत्रिपद घेऊ, अशी भूमिका भुसेंनी घेतल्याचे समजते. मात्र, तरीही फडणवीस यांनी महाजन यांच्याकडे पालकमंत्रिपद दिल्याने हा घाव शिंदे गटाच्या जिव्हारी लागल्याची चर्चा आहे. त्यामुळे महाजन यांना कुंभमेळामंत्री ठेवून सहपालकमंत्रिपद द्यायचे आणि भुसेंकडे पालकमंत्रिपद द्यायचे, या पर्यायावरही आता महायुतीत खल केला जात आहे.

#### भाजपची झाली कोंडी

रायगडचे पालकमंत्रिपद राष्ट्रवादीला दिल्यास नाशिक शिवसेनेला द्या, अशी खेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी खेळल्याची चर्चा आहे. राष्ट्रवादीनेही रायगड शिवसेनेला दिल्यास नाशिक आम्हाला द्या, अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे नाशिक आणि रायगडवरून आता राष्ट्रवादी आणि शिवसेना शिंदे गटातच रस्सीखेच सुरू झाल्याने भाजपची कोंडी झाली आहे. राष्ट्रवादी आणि शिंदे गटाने आपला दावा कायम ठेवला, तर भाजपला नाशिकचे पालकमंत्रिपद गमवावे लागण्याची शक्यता आहे.

#### 'पालकमंत्री स्थानिक असावा'

नाशिक जिल्ह्यात राष्ट्रवादीचे सात आमदार असून, दोन मंत्री आहेत. त्यामुळे नाशिकच्या पालकमंत्रिपदावर राष्ट्रवादीने दावा केला होता. परंतु, कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांना नंदुरबार, तर नरहरी झिरवाळ यांना हिंगोलीचे पालकमंत्रिपद देण्यात आलेले आहे. या निर्णयामुळे झिरवाळ आणि कोकाटे नाराज असल्याची चर्चा आहे. त्यामुळे स्थगितीनंतर राष्ट्रवादीचे मंत्री ॲड. कोकाटे यांनीही नाशिकच्या पालकमंत्रिपदावर दावा ठोकला आहे. नाशिकची आमची मागणी पूर्वीही होती आणि आताही आहे. पालकमंत्री स्थानिक असावा, ही एक गोष्ट महत्त्वाची आहे. दुसऱ्या जिल्ह्यात केवळ पाटी टाकायला जायचे, असे चांगले नाही, असे वक्तव्य करीत कोकाटे यांनी बाहेरील व्यक्तीला पालकमंत्रिपद देऊ नये, अशी मागणी केली आहे.

## उध्दव ठाकरेंची शिवसेना हा दलालांचा पक्ष

### एकनाथ पवार यांचा 'शिवसेनेला जय महाराष्ट्र'; लवकर भाजपामध्ये प्रवेश करणार?

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**उद्धव ठाकरेंची शिवसेना हा दलालांचा पक्ष असल्याचा आरोप करत राज्य संघटक एकनाथ पवार यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केला आहे. शिवसेना नेते विनायक राऊत, सुषमा अंधारे आणि संपर्कप्रमुख बबन थोरात हे दलाल असल्याचा गंभीर आरोप करत एकनाथ पवार यांनी पक्षाचा राजीनामा दिला आहे.**




एकनाथ पवार यांनी नांदेडमधील लोहा- कंदार विधानसभेत शिवसेनेकडून निवडणूक लढवली होती. यात त्यांचा पराभव झाला होता. या पराभवाचं खापर त्यांनी या नेत्यांवर फोडलं आहे. मला अशा नेत्यांसोबत काम करायचं नाही असं म्हणत एकनाथ पवार राजीनामा दिल्यामुळे शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. शिवसेनेचा राजीनामा दिला असून लवकरच पुढील भूमिका स्पष्ट करणार असल्याचे पवार यांनी बोलताना सांगितले.

#### शिवसेना सोडून लवकरच भाजपामध्ये घरवापसी..

विधानसभा निवडणुकीपूर्वी एकनाथ पवार यांनी भाजपाला सोडचिट्टी देत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला होता. आता त्यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केला असून लवकरच ते भाजपमध्ये घरवापसी करतील अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# मंगळवार पेठेत काची वस्तीतील घराला आग



## अग्निशमन जवानांनी आग आटोक्यात आणली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मंगळवार पेठेतील काची वस्तीत असलेल्या एका घराला सोमवारी दुपारी आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. आगीत गृहोपयोगी साहित्य जळाले. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही.**

मंगळवार पेठेतील एसएसपीएम प्रशालेच्या पाठीमागील बाजूस काची वस्ती आहे. या वसाहतीत बैठी पत्र्यांची घरे आहे. सोमवारी दुपारी पावणेएकच्या सुमारास घरातून मोठ्या प्रमाणावर धूर येत होता. घरात चव्हाण कुटुंबीय राहायला आहेत. घरात कोणी नव्हते. चव्हाण यांची आजी घराबाहेर बसल्या होत्या.

वस्तीतील रहिवाशांनी काही अंतरावर असलेल्या अग्निशमन दलाच्या नायडू केंद्रात या घटनेची माहिती दिली. त्यानंतर अग्निशमन दलाचा बंब दोन मिनिटात तेथे पोहोचला. अग्निशमन दलाचे तांडेल रऊफ शेख, गणेश पराते, वैष्णव गाडे, दीपक क्षीरसागर, हिरामण मोरे यांनी पाण्याचा मारा करुन आग आटेक्यात आणली. जवानांनी पाच मिनिटात आग आटोक्यात आणली. घरात कोणी नसल्याने दुर्घटना टळली. आगीत गृहोपयोगी साहित्य आणि छताचे पत्रे जळाले. जवानांनी घरातून एक छोटा सिलिंडर बाहेर काढला. आगीमागचे कारण समजू शकले नाही, अशी माहिती अग्निशमन दलातील तांडेल रऊफ शेख यांनी दिली.

# चिकुनगुनियाच्या धोक्यात वाढ

## राज्यभरात रुग्णसंख्येत दुपटीने वाढ

। पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यात कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पहिल्या पंधरवड्यात चिकुनगुनियाच्या रुग्णसंख्येत जवळपास दुपटीने वाढ झाली आहे. याच वेळी हिवताप आणि डेंग्यूच्या रुग्णसंख्येत गेल्या वर्षीच्या तुलनेत घट झाली आहे.**

राज्यात यंदा १ ते १६ जानेवारीदरम्यान चिकुनगुनियाचे १३० रुग्ण आढळून आले आहेत. गेल्या वर्षी याच कालावधीत चिकुनगुनियाचे ७७ रुग्ण आढळले होते. त्याच वेळी हिवतापाचे यंदा ४०१ रुग्ण आढळून आले असून, गेल्या वर्षी याच कालावधीत ही रुग्णसंख्या ५७२ होती. डेंग्यूची रुग्णसंख्या पहिल्या पंधरवड्यात २१० असून, गेल्या वर्षी ती ४२६ होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा चिकुनगुनियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. याच वेळी डेंग्यूची रुग्णसंख्या कमी झाली आहे. कीटकजन्य आजारांमुळे यंदा राज्यात अद्यापपर्यंत एकही मृत्यू झालेला नसल्याचे आरोग्य विभागाच्या ताज्या अहवालातून समोर आले आहे.राज्यात पहिल्या पंधरवड्यात चिकुनगुनियाचे सर्वाधिक २० रुग्ण अकोला महापालिकेत आढळले असून, बृहन्मुंबई महापालिका १९, सातारा जिल्हा १७, अकोला जिल्हा १५ अशी रुग्णसंख्या आहे. हिवतापाचे सर्वाधिक १८५ रुग्ण बृहन्मुंबई महापालिकेत नोंदविण्यात आले असून, त्या खालोखाल गडचिरोलीत १३८ रुग्ण आढळून आले आहेत.

डेंग्यूचे सर्वाधिक ४४ रुग्ण बृहन्मुंबई महापालिकेत नोंदविण्यात आले असून, त्या खालोखाल अकोल्यात २३ रुग्ण आढळले आहेत.कीटकजन्य आजाराचा रुग्ण आढळल्यास त्या परिसरामध्ये तापरुग्णांचे सर्वेक्षण आरोग्य विभागाकडून केले जात आहे. ताप रुग्णांवर लक्षणानुसार उपचार करण्यात येत आहेत. याचबरोबर कीटकजन्य आजारांचा प्रसार झालेल्या परिसरात डासोत्पत्ती स्थाने शोधून ती नष्ट केली जात आहेत. तसेच, डासप्रतिबंधक औषधांची फवारणीही आरोग्य विभागाकडून सुरू आहे.



### हिवतापाचे 401 रुग्ण आढळून आले

गेल्या वर्षी याच कालावधीत चिकुनगुनियाचे ७७ रुग्ण आढळले होते. त्याच वेळी हिवतापाचे यंदा ४०१ रुग्ण आढळून आले असून, गेल्या वर्षी याच कालावधीत ही रुग्णसंख्या ५७२ होती. डेंग्यूची रुग्णसंख्या पहिल्या पंधरवड्यात २१० असून, गेल्या वर्षी ती ४२६ होती. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा चिकुनगुनियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. याच वेळी डेंग्यूची रुग्णसंख्या कमी झाली आहे. कीटकजन्य आजारांमुळे यंदा राज्यात अद्यापपर्यंत एकही मृत्यू झालेला नसल्याचे आरोग्य विभागाच्या ताज्या अहवालातून समोर आले आहे.

# हॉटेल चालकाकडे खंडणीची मागणी

। पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई केल्यानंतर जामीन मिळवून कारागृहातून बाहेर आलेल्या गुंडाकडून धानोरी जकात नाका भागातील हॉटेलची तोडफोड केली. गुंडाने हॉटेल चालकाला धमकावून दरमहा १५ हजार रुपये हप्त्याची मागणी केली. हॉटेल व्यवस्थापकासह मालकाला मारहाण केली. याप्रकरणी गुंडासह आठ जणांविरुद्ध विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी सराइत गुंड रोहन अशोक गायकवाड, गणेश राठोड यांच्यासह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत हॉटेल चालक अन्सार गफूर शेख (वय ३२, रा. मुंजाबा वस्ती, धानोरी) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी रोहन गायकवाड याच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न, बेकायदा शस्त्र बाळगणे, दहशत माजविणे, मारामारी, तसेच खंडणी मागणे असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे विमानतळ आणि येरवडा पोलीस ठाण्यात दाखल आहेत. २०२२ मध्ये विमानतळ पोलिसांनी त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई केली होती. मोक्का कारवाई केल्यानंतर गायकवाड आणि साथीदार येरवडा कारागृहात होते.गायकवाडने याप्रकरणात न्यायालयाकडून जामीन मिळविला होता. शनिवारी रात्री साडेअकराच्या सुमारास गायकवाड आणि साथीदार धानोरी जकात नाका परिसरातील हॉटेल अमिरमध्ये जेवण करण्यासाठी आले होते. त्या वेळी तेथे काही तरुण जेवण करत होते. गायकवाड आणि साथीदारांनी हॉटेलमधील ग्राहकांना शिवीगाळ करुन त्यांच्याशी भांडणे सुरू केली. हॉटेल मालक अन्सार शेख यांनी भांडणे सोडवून गायकवाड आणि साथीदारांना बाहेर जाण्यास सांगितले. गायकवाड आणि साथीदार तेथून निघून गेले.

## सोसायटी फेडरेशनच्या ‘महासंमेलन’ला उत्स्फूर्त प्रतिसाद

# सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध!

## भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांचा विश्वास



**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**माझ्या संघर्षाच्या काळात सोसायटीधारक नागरिकांनी मला साथ दिली. त्यांच्या समस्या आणि अडचणी सोडवण्यासाठी कायम प्राधान्य देण्यात येईल. रक्ताची नाती नसतानाही ही आपुलकीचे नाते तयार झाले. विधानसभा निवडणुकीत सोसायटीधारकांच्या मदतीमुळेच मी विजयाची ‘हॅट्रिक’ करु शकलो. याबाबत सोसायटीधारकांसोबत कृतज्ञता व्यक्त करतो, अशा भावना भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.**





चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून शहरातील सोसायटीधारकांसाठी “महासंमेलन-2025” आयोजित करण्यात आले. यावेळी आमदार लांडगे बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे, सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांच्यासह फेडरेशनचे पदाधिकारी आणि हजारोंच्या संख्येत सोसायटीधारक उपस्थित होते.

विशेष म्हणजे, “जय जय महाराष्ट्र माझा..” हे महाराष्ट्र गीत गाऊन आमदार महेश लांडगे यांनी उपस्थित सोसायटीधारकांची मने जिंकली. पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी मनोगतात फेडरेशनच्या कामाचे आणि त्यांच्या एकजुटीचे कौतुक केले. प्रभुणे म्हणाले की, चिंचवडमध्ये क्रांतिवीर साफेकर स्मारक समितीच्या माध्यमातून शोषित वंचित घटकांसाठी काम केले जाते. या शहराने अशा घटकांसाठी मोठे काम केले आहे. चोऱ्यामाऱ्या करणारी मुले आज शिकतात, मोठी होतात तेव्हा या शहराचे दातृत्व दिसून येते.

### सोसायटी धारक यांचे प्रश्न सोडविले जाणार

सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे म्हणाले की, चिखली मोशी सोसायटी फेडरेशनच्या माध्यमातून या भागातील सोसायटी धारकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. उपयोग कर्ता शुल्क नागरिकांच्या माथी मारली जात असताना फेडरेशननी भूमिका घेतली. आमदार महेश लांडगे यांची साथ या भूमिकेला लाभली. यांच्या माध्यमातून हे शुल्क रद्द झाले. अशी अनेक नागरिकांच्या उपयोगाची कामे फेडरेशनच्या माध्यमातून केली जातात. त्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून या भागातील आमदारांची खंबीर साथ लागते. म्हणूनच ही अराजकीय फेडरेशन असतानाही संपूर्ण फेडरेशन आमदार लांडगे यांच्या पाठीशी कायमच खंबीरपणे उभे आहे. आगामी काळातही पार्किंग रस्ते ,पाणी, विकसक आणि सोसायटी धारक यांचे प्रश्न सोडवण्यासाठी फेडरेशनच्या माध्यमातून काम केले जाणार आहे, असेही सांगळे यांनी भाषणात नमूद केले.

---

## शिष्याची समृद्धी हीच गुरूला मिळालेली गुरुदक्षिणा

### डॉ. पुरुषोत्तम महाराज राजीमवाले : श्री स्वामी समर्थांच्या पादुकांचा दर्शन सोहळा, सामूहिक अग्निहोत्र

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**अग्निहोत्र ही मूळ वैदिक उपासना आहे. आपला शिष्य सामर्थ्यवान बनला पाहिजे. यासाठी गुरु नेहमीच प्रयत्न करत असतात. शिष्याची समृद्धी, कल्याण, चेहऱ्यावरील हास्य, आनंद हीच गुरूला मिळालेली गुरुदक्षिणा असते. प्रत्येक शिष्य आनंदी राहावा हीच स्वामींची इच्छा असते. म्हणून स्वामी सांगतात जीवनात गर्व कधीही बाळगू नये. समर्पित भावनेने केलेली साधना तुम्हाला जीवनातील अत्युच्च आनंदाची प्राप्ती देते असे मार्गदर्शन विश्व फाउंडेशन शिवपुरीचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम महाराज राजीमवाले यांनी केले.**



भारत केसरी पै. विजय हनुमंत गावडे सोशल फाउंडेशनच्या वतीने रविवारी (दि.१९) चिंचवड येथे प्रथमच श्री स्वामी समर्थांच्या पादुकांचा दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या निमित्त श्री स्वामी समर्थ चिन्मय पादुका मठ, गुरुमंदिर (श्री बाळाप्पा महाराज मठ) यांच्या सहकार्याने श्रीमंन महासाधू श्री मोरया गोसावी समाधी मंदिर शेजारी, देऊळ मळा येथे भव्य सामूहिक अग्निहोत्र करण्यात आले.

अकराशे साधकांनी अग्निहोत्र मध्ये सहभाग घेतला. चिंचवड देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव यांनी उपस्थितांना शुभ आशीर्वाद दिले.डॉ. पुरुषोत्तम महाराज राजीमवाले म्हणाले की, जीवनात चिंतामुक्तीसाठी गुरूंचे सानिध्य व आशीर्वाद आवश्यक आहेत. जीवनाचे खरे रहस्य गुरु शिष्य परंपरेत दडलेले आहे. स्वामी समर्थांच्या या पादुका भारतातील अध्यात्माचे प्रतीक आहे. गुरुचरणी नतमस्तक होऊन केलेली साधना निर्भयतेने, आनंदाने जगण्यास प्रेरणा देते. आपल्या हृदयात आलेला प्रत्येक सद्विचार आनंदाची अनुभूती देतो. देशाला गौरवशाली, वैभवशाली बनवण्यासाठीचा मार्ग गुरु शिष्य परंपरेत आहे.

# गौतम अदानींचा डाव, 'हिंडेनबर्ग'चा पाडाव !



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**अवघ्या जगात गेल्या वर्षभरात आर्थिक आघाडीवर धुमाकूळ घालणाऱ्या 'हिंडेनबग रिसर्च' या संस्थेचं दुकान बंद पडलं आहे. ते कसं बंद पडलं, का बंद पडलं ? याची चर्चा सर्वत्र जोमात होऊ लागली आहे. पण, त्यांचा पाडाव करणाऱ्यांमध्ये भारताचे उद्योगपती गौतम अदानी यांचा मोठा डाव आहे, अशी खमंग चर्चा मात्र जोर धरू लागली आहे. संपूर्ण जगाची आर्थिक आघाडी एक तर उभी करण्यात किंवा विस्कटवण्यात 'हिंडेनबर्ग रिसर्च' या कंपनीच्या साम्राज्याने मोठा वाटा उचलला होता आणि त्या आधारे आपले साम्राज्य मात्र उभे केले होते. या कंपनीने अनेक वेळा आपल्या अहवालांनी खळबळ उडवून दिली होती. आता, मात्र तिने गाशा गुंडाळला असून आर्थिक दुकानाला चक्क टाळा ठोकला आहे.**




पूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षपद ज्यो बायडन यांच्याकडे असताना 'हिंडेनबर्ग' कंपनीचे चांगले दिवस आले होते. जगातील अर्थव्यवस्था डळमळीत व्हावी किंवा काही राष्ट्रीय आर्थिक आघाडीवर संकटात यावीत, यासाठी अमेरिका या कंपनीमार्फत जाळे टाकत होती,हे आता लपून राहिलेले नाही. अमेरिकेचा इतिहासच असा आहे की त्यांना आपल्यापेक्षा कोणतेही राष्ट्र आर्थिक दृष्ट्या प्रबळ झाल्याचे बघवत नाही. बायडन यांनी या कामाची जबाबदारी म्हणा किंवा आशीर्वाद म्हणा, या कंपनीला मोकळा हात दिला होता, याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे.

## मोदी - ट्रम्प यांची दोस्ती जगजाहीर

भारतामध्ये नरेंद्र मोदी यांचे सरकार आणि अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार असताना सगळे कसे व्यवस्थित चालले होते. पण, बायडन सत्तेवर येताच अमेरिका-भारत यांच्या संबंधांमध्ये चढाओढीची ठिणगी पडलीच ! आता पुन्हा एकदा नव्या पर्वाला सुरुवात होत आहे. भारतामध्ये पुन्हा नरेंद्र मोदी यांचे सरकार आले आहेत तर अमेरिकेत पुन्हा डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येत आहेत. उद्योगपती अदानी हे नरेंद्र मोदी यांचे निकटवर्ती असल्याचा आरोप विरोधी पक्षांचे नेते सतत करीत असतात आणि त्यात तथ्यही आहे. त्यामुळेच, या कंपनीला आपले संशोधन बंद करण्यामागेही गौतम अदानी हेच असल्याचे सांगितले जाते, त्यात आता काहीही लपून राहिलेले नाही.

## दुकान बंद झाल्याने परिणाम काय?

'हिंडेनबर्ग' बंद करण्याचा परिणाम भारतावरही होणार आहे. अदानी, 'सेबी'च्या माजी अध्यक्ष माधवी बुच-पुरी यांना दिलासा मिळण्याबरोबरच अदानी यांच्या शेअर्सहोल्डरची चांदी होणार आहे, असा मोठा अंदाज व्यक्त होत आहे. तसा विचार केला तर ही कंपनी पूर्वीची नाही. अगदी सात-आठ वर्षांपूर्वी कंपनीची स्थापना २०१७ मध्ये झाली. कंपनीने गेल्या सात वर्षात सात मोठ्या कंपन्यांना धक्का दिला आहे. एक गोष्ट मात्र नक्की की 'हिंडेनबर्ग'ने सातत्याने अदानी समूहाला लक्ष्य केले आहे. कंपनीने २०२३ मध्ये समूहाविरुद्ध अहवाल प्रकाशित करणे सुरू ठेवले आणि त्यावर कॉर्पोरेट फसवणुकीचा आरोप केला.

## मूल्य घसरवण्यात मोठा वाटा

'हिंडेनबर्ग'च्या आरोपांनंतर अदानी समूहाला आर्थिक आघाडीवर दबावाचा सामना करावा लागला आणि समूहाचे बाजारमूल्य अब्जावधी डॉलर्सने घसरले. तथापि, नंतर अदानी समूहाने शेअर बाजारात झालेले बहुतेक नुकसान भरून काढल्याचे चित्र आहे. गेल्या वर्षी, 'हिंडेनबर्ग'ने 'सेबी'च्या प्रमुख माधवी पुरी बुच आणि त्यांचे पती धवल बुच यांच्यावर हितसंबंधांच्या संघर्षाचा आरोप केला होता, त्यामुळे मोठी खळबळ ही उडाली होती.

## नेमका काय होता आरोप?

कंपनीने असा आरोप केला होता, की अदानींसाठी पैसे लाँड्रिंग करणाऱ्या परदेशी कंपन्यांमध्ये त्य शेअर्स आहेत. हे आरोप 'व्हिसल ब्लोअर्स' आणि इतर तपासांनी दिलेल्या कागदपत्रांवर आधारित होते. २०२० मध्ये 'हिंडेनबर्ग'ने इलेक्ट्रिक ट्रक निर्माता कंपनी 'निकोला' यांच्या दाव्यावर आक्षेप घेतला होता. या कंपनीचे एक मालक अँडरसन यांनी 'निकोला'च्या एका व्हिडीओला आव्हान दिले. या व्हिडीओमध्ये त्यांचा इलेक्ट्रिक ट्रक प्रचंड वेगाने जात असल्याचे दाखवण्यात आले आहे, जेव्हा प्रत्यक्षात तो ट्रक डोंगरावरून खाली जात होता. या प्रकरणात, २०२२ मध्ये अमेरिकेच्या एका ज्युरीने निकोलाचे संस्थापक ट्रेव्हर मिल्टन यांना फसवणूकप्रकरणी दोषी ठरवले होते.

## आणखी काही कंपन्या 'टार्गेट'वर!

२०२३ मध्ये 'हिंडेनबर्ग रिसर्च'ने आयकान एंटरप्रायझेस एलपीच्या कमाई आणि महसुलाच्या अहवालावर टीका केली. 'हिंडेनबर्ग'ने कंपनीवर तिच्या हिस्सेदारीचे जास्त मूल्यांकन केल्याचा आणि लाभांश देण्यासाठी पॉन्झीसारख्या रचनेचा अवलंब केल्याचा आरोप केला होता. या आरोपांनंतर, इकान एंटरप्रायझेसचे शेअर्स झपाट्याने घसरले आणि कंपनीच्या एकूण संपतीत २.९ अब्ज डॉलरची घट झाली. कंपनीने तिच्या वापरकर्त्यांची संख्या वाढवून दाखवली आहे आणि ग्राहक संपादन खर्च कमी दाखवला आहे. 'हिंडेनबर्ग'चे हे आरोप ब्लॉक इंकसाठी एक आव्हान म्हणून पाहिले जात होते. क्रेडिट कार्ड उद्योगाला धक्का देण्यासाठी २००९ मध्ये जॅक डोर्सी यांनी ब्लॉक इंक. ची स्थापना केली. जॅक डोर्सी हे कंपनीचे सर्वात मोठे शेअरहोल्डर होते. त्यांच्याकडे आठ टक्के हिस्सा होता. एलॉन मस्क हे ट्रम्प यांचे मित्र. त्यांच्याविरोधातही 'हिंडेनबर्ग'चे अहवाल होते. ट्वीटर खरेदीदा वाद चांगलाच गाजला. अँडरसन यांच्याविरोधात मस्क यांनी खटला दाखल केला आहे. 'हिंडेनबर्ग'ने २०२२ मध्ये 'जे अँड जे' खरेदीची चौकशी सुरू केली, त्याचे गूढही गुलदस्त्यात आहे.

## असे का घडले?..अनेक प्रश्न उपस्थित

हिंडेनबर्ग अहवालात भारतीय उद्योगपती गौतम अदानी यांच्याशी व्यावसायिक संबंध असल्याच्या आरोपांवरून 'सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया'(सेबी) ने 'हिंडनबर्ग'ला कारणे दाखवा नोटीस पाठवली होती. पाच महिन्यांनंतरही 'हिंडेनबर्ग'कडून कोणताही प्रतिसाद आलेला नाही. जगभरातील इतर अनेक नियामकांनीही अँडरसन यांच्याविरुद्ध अब्जावधी रुपयांचे मानहानीचे दावे दाखल केले आहेत. अँडरसन यांनी अनेक अहवाल विकून अब्जावधी रुपये कमावले आहेत, असाही आरोप आहे. या आरोपाला अनेक दिग्गजांनी आणि अर्थतज्ञांनी पाठिंबाही दिला आहे.

## अँडरसन यांची वादग्रस्त भूमिका

ब्रिटनमधील मँचेस्टर शहरात उड्डाण करताना 'हिंडेनबर्ग' नावाचे जर्मन विमान ६ मे १९३७ रोजी कोसळले. या अपघातात ३५ जणांचा मृत्यू झाला. चौकशीत असे दिसून आले, की कंपनीने नियमांचे उल्लंघन केले होते आणि विमानात क्षमतेपेक्षा जास्त लोकांना बसवले होते. त्यामुळे हा अपघात झाला. जर कंपनीने नियमांचे पालन केले असते, तर एवढा मोठा अपघात झाला नसता, असा अँडरसनचा विश्वास होता. म्हणूनच अँडरसन यांनी २०१७ मध्ये त्यांच्या कंपनीचे नाव 'हिंडेनबर्ग' ठेवले. अँडरसनने दावा केला, की त्यांना आर्थिक अनियमिततेत गुंतलेल्या कंपन्यांचा पर्दाफाश करायचा होता. जेणेकरून शेअर बाजाराच्या जगात 'हिंडेनबर्ग एअरशिप' सारखी दुर्घटना घडू नये आणि गुंतवणूकदारांना त्यांचे कष्टाचे पैसे गमावावे लागत नाहीत. अमेरिकेतील अध्यक्ष जो बायडेन यांचा कार्यकाळ पूर्ण होण्यासाठी काही दिवसच शिल्लक शपथ घेत असताना 'हिंडेनबर्ग'ची बंदची घोषणा करण्याची भूमिका म्हणूनच महत्त्वाची आहे. भारतात मोदी आणि अमेरिकेमध्ये ट्रम्प जगातील संपूर्ण अर्थव्यवस्था बदलवून टाकू शकतात याची खात्री हिंडेनबर्ग रिसर्च ला असणार, या दोन ताकदवान शक्ती आणि त्यांचे मित्र उद्योगपती गौतम अदाणी कंपनीच्या विरोधात काहीही करू शकतात, हे भविष्य कदाचित या कंपनीला उमगले असेल, आणि म्हणूनच त्यांनी अशा पद्धतीने बहरलेली कंपनी बंद करण्याचा निर्णय घेतला असावा, असेच सूचक संदेश आर्थिक आघाडीवरून येत असून अदानी गोटामध्ये मात्र जोरदार जल्लोष सुरू आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पहाटेच्या शपथविधीचं षडयंत्र कुणी रचलं?

## भुजबळांचं मोठं विधान; म्हणाले, “शरद पवार अन् खर्गेंचा वाद

**।मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचं दोन दिवसांपूर्वी शिर्डीत अधिवेशन पार पडलं. या अधिवेशनात बोलताना मंत्री धनंजय मुंडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या २०१९ च्या पहाटेच्या शपथविधीचा उल्लेख करत पहाटेचा शपथविधी हा षडयंत्राचा भाग होता, असा खळबळजनक दावा धनंजय मुंडे यांनी केला. त्यांच्या या दाव्यांनंतर राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या प्रतिक्रिया समोर येत आहेत.**



धनंजय मुंडेंच्या या विधानावर आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया देत काही सवाल उपस्थित केले आहेत. ‘अजित पवारांच्या पहाटेच्या शपथविधीचं षडयंत्र कुणी रचलं? हे षडयंत्र राष्ट्रवादीतील लोकांनी रचलं की भारतीय जनता पक्षाच्या लोकांनी रचलं? याची माहिती नाही. मात्र, त्यावेळी शरद पवार आणि मल्लिकार्जुन खर्गे यांच्यात वाद झाला होता, असं म्हणत तेव्हा नेमकं काय घडलं होतं? हे भुजबळांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं.राज्य सरकारने नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाच्या निर्णयाला स्थगिती दिली. यावर बोलताना छगन भुजबळ म्हणाले, “काहीतरी अडचणी निर्माण झाल्या असतील त्यामुळे नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाच्या निर्णयाला स्थगिती दिली असेल. सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दावोस दौऱ्यावर आहेत. दावोसमध्ये जागतिक परिषद असते त्या परिषदेतून उद्योग आपल्या राज्यात आणण्यासाठी ते तिकडे गेलेले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस दौऱ्यावरून आल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे त्यांच्याशी चर्चा करतील आणि त्यावर नक्कीच मार्ग काढतील”, असं छगन भुजबळ यांनी म्हटलं. नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाच्या निर्णयाला राज्य सरकारने स्थगिती दिल्यानंतर कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी नाशिकचं पालकमंत्रिपद हे राष्ट्रवादीला मिळावं, अशी मागणी केली. या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्याचं पालकमंत्री पद हे राष्ट्रवादीला मिळावं का? यावर तुमची काय प्रतिक्रिया आहे? असं छगन भुजबळ यांना विचारला असता ते म्हणाले, “अशी मागणी कोणी केली याबाबत मला काहीही माहिती नाही”, अशी मोजक्या शब्दांत भुजबळांनी प्रतिक्रिया दिली.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अधिवेशनात धनंजय मुंडे यांनी अजित पवार यांच्या पहाटेचा शपथविधी हा षडयंत्राचा भाग होता, असं मोठं विधान केलं होतं. त्यांच्या या विधानावर छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली. भुजबळ म्हणाले, “धनंजय मुंडे यांचं भाषण झालं तेव्हा मी त्या ठिकाणी नव्हतो. मात्र, मी माध्यमातून थोडसं ऐकलं. धनंजय मुंडेंनी म्हटलं की पहाटेचा शपथविधी हे एक षडयंत्र होतं. जर षडयंत्र होतं तर ते षडयंत्र कोणी रचलं? मग उद्धव ठाकरे तर षडयंत्र रचू शकत नाहीत. काँग्रेसचेही नेते षडयंत्र रचू शकत नाही. मग षडयंत्र कोणी रचलं?”, असा सवाल छगन भुजबळ यांनी केला. भुजबळ पुढे म्हणाले, “मग हे षडयंत्र राष्ट्रवादीतील लोकांनी रचलं की भारतीय जनता पक्षाच्या लोकांनी रचलं? याची काही माहिती नाही. मात्र, मला एवढं आठवतं की २०१९ मध्ये बैठका सुरु होत्या. त्यामध्ये शरद पवार आणि उद्धव ठाकरे आणि काँग्रेसचे नेत्यांमध्ये बैठका सुरु होत्या. तेव्हा काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि शरद पवारांचा थोडा वाद झाला होता, तेव्हा शरद पवार रागाने निघून गेले होते. पण त्यानंतर प्रमुख नेत्यांच्या बैठका सुरुच होत्या. त्याप्रमाणे ८ वाजता एका ठिकाणी बैठक बोलावली गेली होती. मात्र, त्या बैठकीला अजित पवार हे उपस्थित नव्हते”, असंही छगन भुजबळ यांनी म्हटलं. “तेव्हा अजित पवार बैठकीला उपस्थित नव्हते तेव्हा आम्हाला वाटलं की ते कुठे काही कामात अडकले असतील.

### छगन भुजबळ काय म्हणाले?

मात्र, त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी टिव्ही लावली आणि लक्षात आलं की अजित पवार यांचा शपथविधी झाला आहे. त्यानंतर मी तातडीने शरद पवारांकडे गेलो, तेव्हा शरद पवार यांनी उद्धव ठाकरे यांना फोन केला आणि सांगितलं होतं की आपण मजबुतीने उभं राहिलं पाहिजे आणि जे काही झालं आहे ते होणार नाही, याची काळजी घेण्यासाठी कामाला लागलं पाहिजे असं शरद पवारांनी उद्धव ठाकरेंना म्हटलं होतं”, असं छगन भुजबळांनी म्हटलं. धनंजय मुंडेंच्या या विधानावर आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया देत काही सवाल उपस्थित केले आहेत. ‘अजित पवारांच्या पहाटेच्या शपथविधीचं षडयंत्र कुणी रचलं? हे षडयंत्र राष्ट्रवादीतील लोकांनी रचलं की भारतीय जनता पक्षाच्या लोकांनी रचलं? याची माहिती नाही. मात्र, त्यावेळी शरद पवार आणि मल्लिकार्जुन खर्गे यांच्यात वाद झाला होता, असं म्हणत तेव्हा नेमकं काय घडलं होतं? हे भुजबळांनी माध्यमांशी बोलताना सांगितयावर बोलताना छगन भुजबळ म्हणाले, “काहीतरी अडचणी निर्माण झाल्या असतील त्यामुळे नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाच्या निर्णयाला स्थगिती दिली असेल. सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दावोस दौऱ्यावर आहेत.

---

# लाडक्या बहिणींसाठी ३,७०० कोटींचा चेक दिला

## अर्थमंत्री अजित पवारांनी सांगितली पैसे मिळण्याची तारीख

**। कोल्हापूर ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**लाडकी बहीण योजना महायुतीला पुन्हा सत्तेत आणण्यासाठी महत्त्वाची ठरली होती. नोव्हेंबरमध्ये निवडणुकीची प्रक्रिया पार पडल्यानंतर नव्या वर्षाचे हप्ते कधीपासून सुरू होणार, याचीच उत्सुकता योजनेच्या लाभार्थी महिलांना लागली होती. तसेच योजनेबाबत अनेक शंकाकुशंका उपस्थित केल्या जात होत्या. योजनेसाठी निकष लावले जाणार असून अनेक महिला अपात्र ठरू शकतात, अशीही चर्चा मध्यंतरी होती.**

यावर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कोणत्या महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, हे त्यांनी सांगितले आहे. तसेच लाभार्थी महिलांना पुढचा हप्ता कधीपासून मिळणार? याची तारीखही त्यांनी सांगितली आहे.“महायुतीचे सरकार आले तर लाडक्या बहिणींना पैसे मिळणार नाहीत, ते योजना बंद करतील, असा आरोप विरोधकांनी आमच्यावर केला. पण माझ्याकडे अर्थ खाते आहे. आ

आम्ही वचनपूर्ती करणारच आहोत. पण योजनेतल्या त्रुटी असतील त्या आम्ही काढू. जी




भगिनी खुरपणीला जाते, धुणी-भांडी करते, जी अतिशय गरीब कुटुंबातून आली आहे. जिल्हा १५०० रुपयांचे महत्त्व समजते, तिलाच योजनेचा लाभ दिला जाईल. ज्या महिला प्राप्तीकर भरतात, ज्या मोठा पगार घेतात, अशा महिलांसाठी हे दीड हजार रुपये नाहीत”, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले. अजित पवार पुढे म्हणाले, ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांच्या आत आहे. आता मात्र माझ्या लाडक्या बहिणींना आवाहन आहे की, ज्यांचे उत्पन्न अडीच लाखांच्या वर आहे, त्यांनी गरीब महिलांकरिता लाडकी बहीण योजनेचा लाभ घेऊ नये. मागे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आवाहन केल्यानंतर अनेकांनी गॅसचे अनुदान सोडले होते. तशाच प्रकारे आताही केले जावे.

### विरोधकांनी आमच्यावर केला

पण परवाच महिला व बाल विकास खात्याकडे ३,७०० कोटींचा चेक दिला असल्याचेही उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. आता काही महिलांच्या खात्यात पैसे येण्यास सुरुवात झाली आहे किंवा २६ तारखेपासून लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे येण्यास सुरुवात होईल.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कोणत्या महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, हे त्यांनी सांगितले आहे. तसेच लाभार्थी महिलांना पुढचा हप्ता कधीपासून मिळणार? याची तारीखही त्यांनी सांगितली आहे.“महायुतीचे सरकार आले तर लाडक्या बहिणींना पैसे मिळणार नाहीत, ते योजना बंद करतील, असा आरोप विरोधकांनी आमच्यावर केला.

# अमेरिकेसारखा देश या जगात नाही!

## अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होताच डोनाल्ड ट्रम्प यांचं पहिलं भाषण

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांनी शपथ घेतली. सोमवारी भारतीय वेळेप्रमाणे रात्री १०.३० च्या सुमारास हा सोहळा पार पडला. राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेतल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी पहिलंवहिलं भाषण केलं त्यात ते म्हणाले की अमेरिकेत या क्षणापासून सुवर्ण युग सुरु झालं आहे.**




डोनाल्ड ट्रम्प म्हणाले या क्षणापासून अमेरिकेत सुवर्ण युग सुरु झालं आहे. आता जगातला कुठलाही देश हा आपला वापर करु शकणार नाही. आता आपण आपल्या एकतेसाठी आणि अमेरिकेला महान बनवण्यासाठी एकत्र आलो आहोत. आपल्या देशात कुठलीही घुसखोरी आता नामंजूर असं म्हणत त्यांनी अमेरिका ग्रेट अगेनचा नारा दिला.आजची तारीख म्हणजेच २० जानेवारी हा अमेरिकेसाठी स्वातंत्र्याचा दिवस आहे असंच मला वाटतं आहे. आपल्या देशाशी शत्रुत्व घेतलं तर त्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देऊ आणि धडा शिकवू या आशयाचं वक्तव्यही ट्रम्प यांनी केलं. माझ्यावर प्रचारादरम्यान हल्ला झाला होता. मात्र मी वाचलो कारण मला अमेरिकेला खूप पुढे न्यायचं आहे असंही डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. डोनाल्ड ट्रम्प आपल्या भाषणात पुढे म्हणाले, "अमेरिकेसारखा देश जगात एकही नाही. सगळं जग आपला सन्मान करतं आहे. आपल्याला आणखी समृद्ध व्हायचं आहे हे विसरु नका. जगाला गौरव वाटेल असं राष्ट्र होणं आणि समृद्ध होणं ही आपली सगळ्यांची प्राथमिकता आहे." असंही डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. अमेरिकेच्या दक्षिण सीमेवर राष्ट्रीय आणीबाणीची घोषणाही डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या भाषणात केली. तसंच दक्षिण सीमेवर जी घुसखोरी होते आहे ती रोखण्यासाठी लष्कर पाठवलं जाईल अशीही घोषणा ट्रम्प यांनी केली.डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की मला लोकांनी निवडून दिलं. लाखो लोकांचं प्रेम मतांच्या रुपांमध्ये मिळालं. सात स्विंग स्टेट्स जिंकले. तसंच आपल्याला हे यश ज्या ईश्वराने दिलं त्यालाही आपण कधीही विसरणार नाही. अमेरिका हा देश कधीही अपयशी होणार नाही हे लक्षात ठेवा, सगळ्यांनी एक व्हा, आपल्याला एकत्र येऊन अमेरिकेला आणखी समृद्ध करायचं आहे. असंही ट्रम्प म्हणाले.पती डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्यासाठी आलेल्या मेलेनिया ट्रम्प यांनी न्यूयॉर्कहून डिझाईन करण्यात आलेला खास ड्रेस परिधान केला होता. मेलेनिया यांचा हा खास ड्रेस रॉल्फ लॉरेन यांनी डिझाईन केला होता. तसंच या खास ड्रेसवर मेलेनिया यांनी बोलेरो जॅकेट घातलं होतं. तसंच खास प्रकारचे हातमोजेही घातले होते.रविवारी म्हणजेच शपथविधी सोहळ्याच्या आधी एक खास डिनर आयोजित करण्यात आलं होतं. यावेळी आलेल्या सगळ्यांना संबोधित करताना डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की मी पदभार स्वीकारल्यानंतर पुढच्या काही तासांमध्ये अनेक आदेशांवर सह्या करणार आहे असं सांगितलं होतं.डोनाल्ड ट्रम्प यांचा शपथविधी सोहळा पार पडला. डोनाल्ड ट्रम्प यांना राष्ट्राध्यक्ष म्हणून आणि जेडी वेन्स यांना उपराष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ देण्यात आली. शपथविधी सोहळ्याच्या आधी डोनाल्ड ट्रम्प यांना रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनीही शुभेच्छा दिल्या. युक्रेन, तसंच अण्वस्त्रांबाबत नव्या अमेरिकेन सरकारशी चर्चा करण्याची आमची तयारी आहे असंही पुतिन यांनी म्हटलं आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेताच पहिल्या दिवशी २०० पेक्षा जास्त महत्वाच्या निर्णयांवर ते स्वाक्षरी करणार आहेत. ज्यामध्ये सीमा सुरक्षा, ऊर्जा यासह राष्ट्रीय सीमा आणीबाणी संदर्भातील निर्णयांचा समावेश आहे. याबरोबरच यूएस आर्मी आणि होमलॅंड सिक्युरिटीला दक्षिण सीमेचं संरक्षण करण्याच्या अनुषंगाने महत्वाचे निर्देश दिले.

### कोणते निर्णय घेण्याची शक्यता?

वृत्तानुसार, डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेताच पहिल्या दिवशी २०० पेक्षा जास्त महत्वाच्या निर्णयांवर ते स्वाक्षरी करण्याची शक्यता आहे. ज्यामध्ये सीमा सुरक्षा, ऊर्जा यासह राष्ट्रीय सीमा आणीबाणी संदर्भातील निर्णयांचा समावेश असू शकतो. याबरोबरच यूएस आर्मी आणि होमलॅंड सिक्युरिटीला दक्षिण सीमेचं संरक्षण करण्याच्या अनुषंगाने महत्वाचे निर्देश दिले जाण्याची शक्यता आहे.या बरोबरच यूएस सरकारच्या कामकाजात काही मूलभूत सुधारणा आणि अमेरिकेत कार्यरत असलेल्या गुन्हेगारी टोळ्यांचा नायनाट करण्यासह दक्षिणेकडील सीमा सुरक्षित करण्यासाठी निर्देश देण्यासाठी ट्रम्प प्राधान्य देण्याची शक्यता आहे. याबरोबरच सर्व बेकायदेशीर स्थलांतरितांसाठी सीमा बंद करण्याची घोषणा डोनाल्ड ट्रम्प करण्याची शक्यता आहे. गुन्हेगारी टोळ्यांचा नायनाट करण्यासाठी ते काही एजन्सींच्या अधिकाऱ्यांसह एक टास्क फोर्स तयार करण्याची शक्यता आहे. याबरोबरच सीमेवर भिंत बांधण्याचे काम सुरू ठेवण्याच्या सूचना लष्कराला देण्यात येण्याची शक्यता आहे.डोनाल्ड ट्रम्प म्हणाले या क्षणापासून अमेरिकेत सुवर्ण युग सुरु झालं आहे.

---

# कोलकाता बलात्कार: संजय रॉयला जन्मठेप!

## आम्ही फाशीच्या शिक्षेची मागणी करत आहोत : ममता बॅनर्जी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कोलकाता येथील आर जी कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर बलात्कार आणि हत्या केल्याप्रकरणी संजय रॉय याला सियालदह न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या बलात्कार आणि हत्येच्या घटनेनेंतर संपूर्ण देश हादरून गेला होता.**



तसेच देशभरातून याचा निषेध करण्यात आला होता. इतकेच नाही तर देशभरातील डॉक्टर हे त्यांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले होते. दरम्यान पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी या न्यायालयाने दिलेल्या निकालावर "मी समाधानी नाही", अशी प्रतिक्रिया माध्यमांशी बोलताना दिली आहे. ९ ऑगस्ट रोजी झालेल्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी आरोपी संजय रॉय याला अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अनिर्बन दास यांनी दोषी ठरवले होते. त्यानंतर दोन दिवसांनी ही जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे."पहिल्या दिवसापासून आम्ही फाशीच्या शिक्षेची मागणी करत आहोत. प्रकरण आमच्याकडून (कोलकाता पोलीस) काढून घेण्यात आले आणि केंद्रीय अन्वेषण ब्युरोने तपास केला. असा गुन्हा करणाऱ्या व्यक्तीला सर्वोच्च शिक्षा व्हायला हवी होती," असे बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी मुर्शिदाबादमध्ये माध्यमांशी बोलताना म्हणाल्या.९ ऑगस्ट रोजी आरजी कर मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात महिला डॉक्टरचा मृतदेह आढळून आला होता. यानंतर इतर सहकारी डॉक्टरांनी अनिश्चित काळासाठी संप जाहीर केला होता. या प्रकरणानंतर पश्चिम बंगालच्या विधानसभेत अपराजिता वूमन अँड चाइल्ड बिल (पश्चिम बंगाल गुन्हेगारी प्रतिबंध कायदा दुरुस्ती विधेयक २०२४) मंजूर करण्यात आले बलात्कार आणि लैंगिक शोषणाच्या प्रकरणात फाशीसारख्या कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली. गेल्या सप्टेंबर महिन्यात मंजूर करण्यात आलेल्या या विधेयकाला अद्याप राष्ट्रपतींची संमती मिळणे बाकी आहे.

### ममता बॅनर्जी काय म्हणाल्या?

देशभरातील डॉक्टर हे त्यांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले होते. दरम्यान पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी या न्यायालयाने दिलेल्या निकालावर "मी समाधानी नाही", अशी प्रतिक्रिया माध्यमांशी बोलताना दिली आहे. ९ ऑगस्ट रोजी झालेल्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी आरोपी संजय रॉय याला अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अनिर्बन दास यांनी दोषी ठरवले होते. त्यानंतर दोन दिवसांनी ही जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

# शिवानीचा स्वत:च्याच हळदीत भन्नाट डान्स

‘राजा राणीची गं जोडी’ मालिकेतून घराघरात पोहोचलेली अभिनेत्री शिवानी सोनार लवकरच बोहल्यावर चढणार आहे. उद्या, २१ जानेवारीला शिवानी अभिनेता अंबर गणपुळेशी लग्नबंधनात अडकणार आहे. त्यामुळे सध्या लग्नाआधीचे विधी पाहायला मिळत आहेत. आज शिवानीला हळद लागली आहे. याचे फोटो, व्हिडीओ समोर आले आहेत.५ जानेवारीपासून शिवानी सोनारच्या लग्नाआधीच्या विधींना सुरुवात झाली. त्यानंतर अष्टवर, मेहंदी, संगीत हे समारंभ पार पडले. सध्या शिवानीच्या संगीत सोहळ्यातील व्हिडीओ खूप व्हायरल झाले आहेत. या संगीत सोहळ्यात शिवानीने होणारा नवरा, आई, वडील यांच्याबरोबर जबरदस्त डान्स केल्याचं पाहायला मिळत आहेत. आज शिवानीला अंबरची उष्टी हळद लागली आहे. हळदीसाठी शिवानीने खास लूक केला होता. तिने पिवळी फुलं असलेली पांढरी साडी नेसली होती. ज्यावर तिने मोत्यांच्या माळा आणि केसात गजरा माळला होता. या लूकमध्ये शिवानी खूपच सुंदर दिसत आहे.हळदीच्या समारंभातही शिवानी सोनारचा भन्नाट डान्स पाहायला मिळाला. अजय-अतुलचं लोकप्रिय गाणं ‘ब्रिंग इट ऑन’वर शिवानी थिरकताना दिसत आहे. तिचा हा डान्स व्हिडीओ इन्स्टाग्राम स्टोरीच्या शेअर करण्यात आला आहे.शिवानी सोनारचा होणारा नवरा ‘रंग माझा वेगळा’ मालिकेतून घराघरात पोहोचला. या मालिकेत त्याने साकारलेला आदित्य प्रेक्षकांच्या चांगलाच पसंतीस पडला होता.

# फराहने फक्त १४ दिवसांत लिहिलेला ‘ओम शांती ओम

चित्रपट बनवत असताना आपण आपली आवड जोपासत व्यावसायिक गोष्टींकडे जागरूकपणे पाहणे आवश्यक असल्याचे वक्तव्य दिग्दर्शिका फराह खानने केले. जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठी रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात दिग्दर्शक फराह खान यांनी मास्टरक्लासमध्ये उपस्थितांशी संवाद साधला. दिग्दर्शक जयप्रद देसाई यांनी या मास्टरक्लासचे संचालन केले. पुढे बोलताना फराह खान म्हणाली, “गाण्यातून चित्रपटाची कथा पुढे जाणे गरजेचे आहे. आयटम साँगपेक्षा अशी गाणी करणे मला जास्त आवडेल. एक कोरिओग्राफर आणि दिग्दर्शक म्हणून मला ही माझी ताकद वाटते. स्वप्न पाहिली तरच ती पूर्ण करण्याची ताकद तुमच्यात येत असते.” “कोरिओग्राफी आणि डायरेक्टर या दोन्ही जबाबदाऱ्या माझ्यासाठी लर्निंग प्रोसेस होती. कोरिओग्राफर म्हणून काम करत असले तरी दिग्दर्शक म्हणूनच काम करायचे हे पक्के ठरवले होते. त्यामुळे ओम शांती ओम सारखा चित्रपट केवळ १४ दिवसात लिहून पूर्ण झाला. आपली आवड आणि व्यवसायाची सांगड घालता आली तर नक्कीच उत्तम निर्मिती होते. माझ्यासाठी हीच बाब कायम महत्वाची आहे,” असे फराह खान म्हणाली.पुढे बोलताना फराह खान म्हणाली, “इतरांसारखे वागण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा स्वतःचे वेगळेपण जपत कार्यरत राहणे गरजेचे आहे. तुम्ही जे स्वप्न पाहता ते ही सत्यात उतरवविण्यासाठी प्रचंड मेहनत काम करा. आपल्या आयुष्यात असणाऱ्या अडचणी संदर्भात स्वतः कारणे देण्यापेक्षा काम करत राहिले पाहिजे.

# हे सगळं थांबवा : करीना

अभिनेता सैफ अली खानवर त्याच्या वांद्रे (पश्चिम) येथील घरात शिरलेल्या दरोडेखोराने हल्ला केला. या हल्ल्यात सैफ गंभीर जखमी झाला. सैफच्या मानेवर व पाठीवर आणि हातावर जखमा झाल्या. हल्लेखोराने केलेल्या हल्ल्यात चाकूचे एक टोक सैफच्या शरीरात घुसले होते, ते लिलावती रुग्णालयातील डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून काढले. या प्रकरणातील आरोपीला रविवारी अटक करण्यात आली आहे. सैफवर झालेल्या हल्ल्यानंतर करीनाने निवेदन दिलं होतं, त्यानंतर आता तिने एक पोस्ट करत संताप व्यक्त केला आहे. करीनाने एक व्हिडीओ स्टोरीला रिपोस्ट करून हे सगळं थांबवा असं म्हटलं आहे. त्या व्हिडीओवर तैमूर व जेहसाठी नवीन खेळणी आणली आहेत, असं लिहिलं आहे. “हे सगळं थांबवा, थोडी दया दाखवा आणि आम्हाला एकटं सोडा,” असं तिने हा व्हिडीओ पोस्ट करून लिहिलं आहे.सैफ अली खान सध्या लिलावती रुग्णालयात दाखल आहे. जेह, तैमुर, करीना आणि इतर कुटुंबीय सैफला भेटायला रुग्णालयात जातानाचे व्हिडीओ समोर आले होते. ३० वर्षीय आरोपीचे नाव मोहम्मद शरीफुल ऊर्फ विजय दास असे आहे. आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शरीफुल इस्लाम सज्जाद मोहम्मद रोहिल्ला अमीन फकीर बांगलादेशातील झलोकाठी जिल्ह्यातील राजाबरिया गावचा आहे, त्याने आपली खरी ओळख लपवण्यासाठी विजय दास या नावाचा वापर केला.



# अभिषेक बच्चन पालकत्वावर बोलला!

बच्चन कुटुंब हे अनेकदा विविध कारणांमुळे चर्चांचा भाग बनते. त्यामध्ये अमिताभ बच्चन– जया बच्चन यांच्यापासून अभिषेकऐश्वर्याची मुलगी आराध्याचादेखील समावेश असतो. आता अभिषेक बच्चनने नुकत्याच एका मुलाखतीत पालकत्वाबद्दल त्याचा काय दृष्टिकोन आहे, तो याकडे कसे पाहतो यावर वक्तव्य केले आहे.अभिषेक बच्चनने ला दिलेल्या मुलाखतीत म्हटले, “आई-वडील सर्वोत्तम शिक्षक असतात की नाही, हे मला माहीत नाही. पण, मला वाटते आपल्या भावना आडव्या येतात. आपली इच्छा असते की, आपल्या पाल्याला सर्वोत्तम गोष्टी मिळाव्यात, त्याला यश मिळावे आणि ती दुखावली जाऊ नयेत.

# कार्तिकीच्या भावाचा पार पडला साखरपुडा!

मराठी कलाविश्वात सध्या लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. येत्या काही दिवसांत अंबर-शिवानी, अंकिता-कुणाल, दिव्या पुगावकर असे बरेच मराठी कलाकार लग्नबंधनात अडकून एका नव्या आयुष्याला सुरुवात करणार आहेत. या कलाकारांपाठोपाठ काही दिवसांआधीच मराठी सिनेविश्वातील एका लोकप्रिय गायकाने लवकरच विवाहबंधनात अडकणार असल्याचं सांगितलं होतं. हा गायक म्हणजे कार्तिकी गायकवाडचा भाऊ कौस्तुभ. लग्न ठरल्यावर आपल्या होणाऱ्या पत्नीसह त्याने फोटो शेअर केले होते. आता नुकताच कौस्तुभ गायकवाडचा साखरपुडा पार पडला आहे. कौस्तुभ गायकवाडचा साखरपुडा नुकताच पार पडला असून कार्तिकीने याचे खास फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. तसेच भावाला शुभेच्छा देत गायिका लिहिते, “तुम्हाला साखरपुड्याच्या आणि पुढील आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा. दोघंही असेच कायम आनंदी राहा, तुम्हा दोघांना खूप प्रेम”कार्तिकीने शेअर केलेल्या एका फोटोमध्ये कौस्तुभ आणि त्याच्या पत्नीने पारंपरिक लूक केल्याचं पाहायला मिळत आहे. तर, दुसऱ्या एका फोटोत या जोडप्याने इंडो-वेस्टर्न लूक केल्याचं पाहायला मिळत आहे. या समारंभात कौस्तुभने आपल्या होणाऱ्या पत्नीला गुडघ्यावर बसून प्रपोज केलं. याची झलक सुद्धा कार्तिकीच्या इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये पाहायला मिळत आहे.दरम्यान, ‘सारेगमप लिटिल चॅम्प्स’ या शोमधून कार्तिकी गायकवाडघराघरांत लोकप्रिय झाली. ती पहिल्या पर्वाची विजेती ठरली होती. कार्तिकीला आपल्या घरातच गायनाचा वारसा लाभलेला आहे. तिचा भाऊ कौस्तुभ गायकवाड सुद्धा मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय गायक म्हणून ओळखला जातो. काही चित्रपटांसाठी त्याने पार्श्वगायन केलेलं आहे. याशिवाय कार्तिकी, तिचे वडील व भाऊ मिळून गाण्यांचे अनेक शोज देखील करतात. गायकाच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर त्याने २०१७ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘बॉईज’ चित्रपटातलं ‘लग्नाळू’ हे गाणं गायलं आहे. हे गाणं सोशल मीडियावर प्रचंड गाजलं. आजही प्रत्येक समारंभात हे गाणं वाजवलं जातं. याशिवाय कौस्तुभने अनेक अभंग देखील गायले आहेत.मराठी कलाविश्वात सध्या लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. येत्या काही दिवसांत अंबर-शिवानी, अंकिता-कुणाल, दिव्या पुगावकर असे बरेच मराठी कलाकार लग्नबंधनात अडकून एका नव्या आयुष्याला सुरुवात करणार आहेत. या कलाकारांपाठोपाठ काही दिवसांआधीच मराठी सिनेविश्वातील एका लोकप्रिय गायकाने लवकरच विवाहबंधनात अडकणार असल्याचं सांगितलं होतं.



# रोहितच्या डान्सचा व्हीडिओ व्हायरल

## कोई सेहरी बाबू या व्हायरल गाण्यावर डान्स व्हीडिओ केला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वानखेडे स्टेडियमच्या सुवर्णमहोत्सवाचा दिमाखदार सोहळा वानखेडेवर मुंबईत १९ जानेवारीला पार पाडला. मुंबईतील प्रतिष्ठिता वानखेडे स्टेडियम हे १९ जानेवारी १९७५ मध्ये उभारण्यात आले होते आणि आता २०२५ मध्ये या स्टेडियमला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. या कार्यक्रमादरम्यानचा रोहित शर्मा श्रेयस अय्यरला स्टेजवर मैदानावर डान्स करण्यासाठी बोलवतानाचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.**



वानखेडे स्टेडियमच्या पन्नाशीच्या कार्यक्रमात माजी दिग्गज खेळाडू सुनील गावस्कर यांचा ७५वा वाढदिवस साजरा करण्यात आला. लिटिल मास्टर सुनील गावस्कर यांनी २०२५ मध्ये ७५व्या वर्षात पाऊल ठेवलं. येत्या ११ जुलैला त्यांचा ७५वा वाढदिवस असणार आहे. पण या कार्यक्रमादरम्यान सर्व चाहत्यांसमोर केक कापून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यादरम्यान एमसीएचे अध्यक्ष यांनी बॉलीवूड गायक शेखर रावजियानी याला गावस्करांसाठी खास गाणं बोलण्याकरता मंचावर बोलावले. शेखर रावजियानी 'ओम शांती ओम' गाणं गात असताना सर्व खेळाडू मागे उभे असतात. दरम्यान रोहित शर्मा समोर बसलेल्या कोणालातरी इशारा स्टेजवर येण्यासाठी इशारा करताना दिसतो. त्यानंतर तो डान्स मुव्ह करत नाचण्यासाठी स्टेजवर ये असं बोलवताना दिसला, तर रोहित शर्मा हा श्रेयस अय्यरला स्टेजवर डान्स करण्यासाठी बोलवत होता. त्यानंतर रवि शास्त्रीही त्याला बघून काहीतरी बोलतात तेव्हा तो त्यांच्याकडे पाहत हसत श्रेयसला बोलवत असल्याचे सांगतो. श्रेयसही रोहितचा इशारा पाहून जोरजोरात हसू लागतो. रोहितच्या या डान्स मुव्हचा व्हीडिओ चांगलाच व्हायरल होत आहे.

रोहित-श्रेयसच्या या डान्स मुव्हनंतर चाहत्यांना एका जुन्या डान्स व्हीडिओची आठवण झाली. ज्यामध्ये रोहित शर्मा, श्रेयस अय्यर आणि शार्दुल ठाकूरने कोई सेहरी बाबू या व्हायरल गाण्यावर डान्स व्हीडिओ केला होता, जो चांगलाच व्हायरल झाला होता.यानंतर २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफी करंडकासह सर्व दिग्गज खेळाडूंनी फोटो काढला. २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीबद्दल बोलताना, रोहितने २०११ एकदिवसीय विश्वचषक आणि २००७ आणि २-२४ टी-२० विश्वचषक विजयांची आठवण करून देत वानखेडेवर विजेतपद आणण्याची आपली महत्त्वाकांक्षा व्यक्त केली.

'मला खात्री आहे की, चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी आम्ही दुबईत पोहोचू तेव्हा सर्व १४० कोटी भारतीय आम्हाला पाठिंबा देतील. आम्ही चांगली कामगिरी करून २०२५ ची चॅम्पियन्स ट्रॉफी वानखेडे स्टेडियमवर आणण्याचा प्रयत्न करू. वानखेडे स्टेडियमच्या पन्नाशीच्या कार्यक्रमात माजी दिग्गज खेळाडू सुनील गावस्कर यांचा ७५वा वाढदिवस साजरा करण्यात आला. लिटिल मास्टर सुनील गावस्कर यांनी २०२५ मध्ये ७५व्या वर्षात पाऊल ठेवलं. येत्या ११ जुलैला त्यांचा ७५वा वाढदिवस असणार आहे. पण या कार्यक्रमादरम्यान सर्व चाहत्यांसमोर केक कापून त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यादरम्यान एमसीएचे अध्यक्ष यांनी बॉलीवूड गायक शेखर रावजियानी याला गावस्करांसाठी खास गाणं बोलण्याकरता मंचावर बोलावले. शेखर रावजियानी 'ओम शांती ओम' गाणं गात असताना सर्व खेळाडू मागे उभे असतात. दरम्यान रोहित शर्मा समोर बसलेल्या कोणालातरी इशारा स्टेजवर येण्यासाठी इशारा करताना दिसतो. त्यानंतर तो डान्स मुव्ह करत नाचण्यासाठी स्टेजवर ये असं बोलवताना दिसला, तर रोहित शर्मा हा श्रेयस अय्यरला स्टेजवर डान्स करण्यासाठी बोलवत होता. त्यानंतर रवि शास्त्रीही त्याला बघून काहीतरी बोलतात तेव्हा तो त्यांच्याकडे पाहत हसत श्रेयसला बोलवत असल्याचे सांगतो. श्रेयसही रोहितचा इशारा पाहून जोरजोरात हसू लागतो.

### डान्स मुव्हचा व्हीडिओ व्हायरल

रोहितच्या या डान्स मुव्हचा व्हीडिओ चांगलाच व्हायरल होत आहे.रोहित-श्रेयसच्या या डान्स मुव्हनंतर चाहत्यांना एका जुन्या डान्स व्हीडिओची आठवण झाली. ज्यामध्ये रोहित शर्मा, श्रेयस अय्यर आणि शार्दुल ठाकूरने कोई सेहरी बाबू या व्हायरल गाण्यावर डान्स व्हीडिओ केला होता, जो चांगलाच व्हायरल झाला होता.यानंतर २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफी करंडकासह सर्व दिग्गज खेळाडूंनी फोटो काढला. २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीबद्दल बोलताना, रोहितने २०११ एकदिवसीय विश्वचषक आणि २००७ आणि २-२४ टी-२० विश्वचषक विजयांची आठवण करून देत वानखेडेवर विजेतपद आणण्याची आपली महत्त्वाकांक्षा व्यक्त केली. 'मला खात्री आहे की, चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी आम्ही दुबईत पोहोचू तेव्हा सर्व १४० कोटी भारतीय आम्हाला पाठिंबा देतील. वानखेडे स्टेडियमवर आणण्याचा प्रयत्न करू.वानखेडे स्टेडियमच्या सुवर्णमहोत्सवाचा दिमाखदार सोहळा वानखेडेवर मुंबईत १९ जानेवारीला पार पाडला.

# मुंबईच्या रणजी संघाची घोषणा!

## यशस्वी जैस्वाल, श्रेयस अय्यर आणि शार्दुल ठाकूर यांनाही संधी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबई क्रिकेट संघ २३ जानेवारी रोजी जम्मू-काश्मीर विरुद्ध रणजी ट्रॉफी सामना खेळणार आहे. यासाठी आता मुंबई क्रिकेट असोसिएशनने सामन्यासाठीचा संघ जाहीर केला आहे. भारतीय राष्ट्रीय संघातून खेळणाऱ्या अनेक खेळाडूंना संघात स्थान मिळाले आहे. यामध्ये कर्णधार रोहित शर्मा, युवा फलंदाज यशस्वी जैस्वाल, श्रेयस अय्यर आणि शार्दुल ठाकूर यांनाही संधी मिळाली आहे.**



भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा सध्या खराब फॉर्मशी झुंजत असून ऑस्ट्रेलिया दौऱ्यातही त्याची बॅट शांत होती. ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील पाच डावात केवळ रोहित केवळ ३१ धावा करू शकला. यानंतर रोहित शर्मा मुंबईला आल्यानंतर वानखेडे स्टेडियममध्ये मुंबईच्या रणज क्रिकेट संघासह सराव करताना दिसला. तेव्हापासूनच रोहित रणजी खेळणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. अखेरीस रोहित शर्माने रणजी ट्रॉफी खेळणार असल्याचे जाहीर केल्यानंतर आता त्याचा आगामी मुंबई वि जम्मू काश्मीर सामन्यासाठी संघात समावेश करण्यात आला आहे. रोहित शर्मा २०१३ मध्ये उत्तर प्रदेशविरूद्ध अखेरचा सामना खेळला होता. मुंबई संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी अजिंक्य रहाणेकडे सोपवण्यात आली आहे. हार्दिक तामोरे आणि आकाश आनंद यांचा यष्टीरक्षक म्हणून संघात समावेश करण्यात आला आहे. तर दुसरीकडे आयपीएलमध्ये अनसोल्ड राहिलेल्या शार्दुल ठाकूरला संधी मिळाली आहे. त्याला चांगली कामगिरी करून पुन्हा एकदा टीम इंडियात आपली स्थान मिळवण्याचे त्याचं लक्ष्य असेल. तर रोहित शर्मा व्यतिरिक्त यशस्वी जैस्वाल, श्रेयस अय्यर यांनाही संघात संधी देण्यात आली

### रोहित 10 वर्षांनंतर खेळणार रणजी

मुंबई वि जम्मू काश्मीर हा सामना २३ जानेवारीपासून हा सामना २३ जानेवारीपासून एमसीए-बीकेसी मैदानावर सुरू होईल. अजिंक्य रहाणे (कर्णधार), रोहित शर्मा, यशस्वी जैस्वाल, आयुष म्हात्रे, श्रेयस अय्यर, सिद्धेश लाड, शिवम दुबे, हार्दिक तामोरे (यष्टीरक्षक), आकाश आनंद (यष्टीरक्षक), तनुष कोटियन, शम्स मुलानी, हिमांशु सिंग, शार्दुल ठाकूर, मोहित अवस्थी, सिल्वेस्टर डिसूजा, रायस्टन डायस, कर्ष कोठारीयष्टिरक्षक फलंदाज ऋषभ पंतची लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# शैक्षणिक साहित्य खरेदी वादात; पुणे पालिकेच्या शिक्षण मंडळाचा 'उद्योग'

## एकाच कंपनीकडून 6.15 कोटींची खरेदी; स्थायी समितीच्या निर्णयाबाबत उलटसुलट चर्चा सुरू

**। पुणे ।**

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

बालवाडी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी मूलभूत शिक्षण आणि अन्य गोष्टींसाठी पुणे महापालिकेचे शिक्षण मंडळ खासगी प्रकाशन कंपनीची सहा कोटी १५ लाख रुपयांची पुस्तके आणि शैक्षणिक साहित्य खरेदी करणार आहे. स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. निविदा प्रक्रिया राबवूनही एकाच कंपनीच्याच साहित्याची खरेदी केली जाणार असल्याने या निर्णयाबाबत उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी ऑगस्ट २०२४ मध्ये एका खासगी प्रकाशन कंपनीने महापालिकेच्या शिक्षण विभागाला बालवाडी ते इयत्ता आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी मूलभूत शिक्षण, लेखन साहित्य, कला; तसेच कार्यानुभव पुस्तिका, जादुई पिटारा अशी विविध प्रकारची पुस्तके आणि साहित्य खरेदीसाठीचे पत्र दिले होते. पालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी ही पुस्तके महत्त्वपूर्ण



ठरतील, असेही या पत्रात म्हटले होते. त्यानंतर आचारसंहिता सुरू झाल्याने हा प्रस्ताव रखडला. या पुस्तकांची किंमत ६.१५ कोटी रुपये आहे. या पुस्तकांच्या खरेदीसाठी शिक्षण विभागाकडे निधी उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांच्या गणवेश खरेदीच्या शिल्लक निधीतून निधी देण्यात यावा, अशी विनंती करून शिक्षण विभागाने स्थायी समितीसमोर वर्गीकरणाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला. त्याला स्थायी समितीने मंजुरी दिली. विद्यार्थ्यांसाठी पुस्तकांची; तसेच पूरक शैक्षणिक साहित्याची खरेदी करताना निविदा प्रक्रिया राबविली जाणार असल्याचे या प्रस्तावात म्हटले आहे. खरेदी केली जाणारी पुस्तके आणि शैक्षणिक साहित्य एका कंपनीचेच आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया राबवली, तरी या निविदा प्रक्रियेत अन्य कंपन्या कशा सहभागी होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.




# पीएमपीच्या ताफ्याला घरघर; नव्या बसच्या खरेदीला 'ब्रेक'

## 'पीएमपी'च्या बसची संख्या सध्या 1970पर्यंत खाली

| लोणावळा |
प्रतिनिधी : महाईन्यूज

परिवहन महामंडळा'च्या (पीएमपी) ताफ्यातील बसची संख्या सध्या १० वर्षांतील नीचांकी स्तरावर पोहोचली आहे. एके काळी दोन हजारांहून अधिक बस ताफ्यात असणाऱ्या 'पीएमपी'च्या बसची संख्या सध्या १९७०पर्यंत खाली आली आहे.



पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर क्षेत्रातील (पीएमआरडीए) प्रमुख आणि सर्वात मोठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असूनही 'पुणे महानगर परिवहन महामंडळा'च्या (पीएमपी) ताफ्यातील बसची संख्या सध्या १० वर्षांतील नीचांकी स्तरावर पोहोचली आहे. एके काळी दोन हजारांहून अधिक बस ताफ्यात असणाऱ्या 'पीएमपी'च्या बसची संख्या सध्या १९७०पर्यंत खाली आली आहे.

### बससंख्या दुपटीने वाढण्याची गरज

राज्यातील महत्त्वाच्या शहरांमध्ये होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी तातडीने २४ हजार नवीन बसची आवश्यकता असल्याचे एका अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### 'पीएमपी'चा पाय खोलात...

'पीएमपी'च्या मालकीच्या मात्र, १२ वर्षांहून जास्त वयाच्या गाड्या सध्या रस्त्यावर धावत असल्याने लवकरच अनेक बस 'निवृत्त' होऊन ताफ्यातील बसची संख्या आणखी घटण्याची शक्यता आहे. ताफ्यातील बस वाढविण्यासाठी अलीकडील काळात आश्वासनांखेरीज कोणतेही ठोस प्रयत्न झाले नाहीत. 'बसची संख्या वाढवू,' असा शब्द देणारी राजकीय मंडळी निधी देताना हात आखडता घेत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे 'पीएमपी'ची अवस्था आणखी बिकट होण्याकडे सुरू आहे.


